CNR No.MHST12002019

दाखल तारीख : ०१/०८/२०१९
नोंदणी तारीख : ०१/०८/२०१९
निकाल तारीख: ०७/०७/२०२६
कालावधी : वर्षे महिने दिवस
०६ ११ ०५

म्हसवड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, म्हसवड यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : **एस. एस. साळुंखे**)

नियमित दिवाणी दावा क्र. २१६/२०१९ निशाणी क्र. ३९

वादी : १. राजाराम दामु जाधव,
वय– ७१ वर्ष, धंदा – शेती,
रा. पळशी, रामोशीवस्ती ता. माण जि. सातारा

विरूध्द

प्रतिवादी : १) बाळु दामू जाधव (मयत वारस),
वय– ७०, व्यवसाय–शेती,
अ)आक्काताई नाना माने ,
वय– ६१, व्यवसाय–शेती व घरकाम,
रा. मार्डी, ता. माण जि.सातारा.
२) सखाराम राजेंद्र जाधव,
वय– २४, व्यवसाय–काही नाही,
रा. पळशी ता.माण, जि. सातारा.

....

वादींतर्फे विधिज्ञ – श्री.एन. एस. कलढोणे, विद्वान वकील,
प्रतिवादी नं. १ – श्री. एस. ए. सावंत, विद्वान वकील,
प्रतिवादी नं. २ – श्री. डी. एल. हांगे, विद्वान वकील,

....

न्यायनिर्णय

(ता. ०७/०७/२०२६ रोजी घोषित केला)

वादीने सदरचा दावा हा वाद मिळकतीतील त्याचे हिश्याचे सरसनिरस मानाने वाटप होऊन त्याचा पृथक तुकडा पाडून त्याचा कब्जा वादी यांना मिळावा तसेच प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ यास करून दिलेले खरेदीपत्र वादीचे हिश्श्यावर बंधनकारक नाही, म्हणून जाहीर ठराव होवून मिळणेकरिता दाखल केला आहे.

२) वादी यांनी आपल्या दाव्यामध्ये कथन केलेले आहे की, वाद मिळकत ही मौजे पळशी, ता. माण, जि. सातारा येथील शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे:-

अ.नं.	गट नंबर	क्षेत्र हे. आर	आकार रु.पै.	हिस्सा
१	१८३८	ला.ला. ०५.०९	२.०५	१.२७.२५ पो. ख.
		पो. ख. ०.६		०.०१.५० आर

येणेप्रमाणे दावा मिळकत असून दक्षिणोत्तर वादी व प्रतिवादी यांची सामाईकामध्ये वहिवाट आहे. त्यामध्ये असणारे झाडझडुप, दगडमाती यासह या दाव्याचा वाद विषय आहे.

३) वादीने पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकती ही मुळची दामू कृष्णा जाधव यांच्या मालकीहिवाटीच्या असून त्यांना वादी व प्रतिवादी क्र. १ ही मुले आहेत व अन्य कोणी वारस नाही. सदरील दावा मिळकतीत वादीचे ६४.४ आर या क्षेत्राची वादीस सरसनिरस मानाने वाटप करुन त्याचा कब्जा मिळावा. सदरील दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी वादीस सामाईकामध्ये वहिवाट करु देत नाहीत, त्यामुळे वादीने प्रतिवादीस आपल्या येणा-या वडीलार्जीत हिश्यातील ८ आणे हिश्याचे वाटप करुन मागितले असता प्रतिवादीने वाटप करुन देण्यास नकार दिला व दावा मिळकत

माझ्या नावावर आहे, मी ती कोणासही विक्री करणार अशी भाषा प्रतिवादी वापरत आहेत. सदरील प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ यास नुकतेच दावा मिळकतीमधील ४० आर क्षेत्राचे खरेदीपत्र करुन दिलेले आहे. त्यामुळे खरेदीदार दावा मिळकतीमध्ये वादीच्या वहिवाटीस हरकत करुन बेकायदेशीरपणे कब्जा घालण्याच्या नादात आहेत. सदर खरेदीपत्र हे विनाकब्जाचे आहे. ते वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही. तसेच कोणतीही नड नसतांना लोकांची देणी नसतांना प्रतिवादी क्र. १ याने स्वतःच्या स्वार्थासाठी प्रतिवादी क्र. २ यांना खरेदीपत्र करुन देवून पैशाचा दुरुपयोग केला आहे.

४) वादीने पुढे असे कथन केले आहे की, तसेच सदरील दावा मिळकत १२८.७५ गुंठे वादीचे नावे क्षेत्र दिसत आहे. ते क्षेत्र वादीने दि. १०/०९/१९९० रोजी रक्कम रुपये २०,०००/– यास नामदेव गणू मदने यांचेकडून खरेदी केलेले आहे. ते क्षेत्र वडीलार्जीत नाही. त्यामुळे सदरील क्षेत्राचे वाटप करता येणार नाही.

५) वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदरील वादी व प्रतिवादी क्र.१ ब–याच दिवसांपासून विभक्त रहात आहेत. त्यांचे हिंदु एकत्र कुटूंब नाही. त्यांची काही वडीलार्जीत जमीनीचे वाटप झाले आहे. परंतु सदर दावा मिळकतीचे अद्यापी वाटप झालेले नाही. सदर दावा मिळकतीचे ७/१२ उता–यावर सामाईक हिस्सेदार आहेत त्यांचे हिस्यामध्ये वादीस वाटप मागण्याचे नसल्याने त्यांना याकामी पक्षकार केले नाही. सबब, वादीस दावा मिळकतीतील त्यातील हिश्याचे सरसनिरस मानाने वाटप होवून मिळावे व प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ यांस दावा मिळकतीतील क्षेत्राचे करुन दिलेले खरेदीपत्र त्याचे हिस्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवून मिळावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

६) सदर दावा प्रलंबीत असतांना प्रतिवादी क्र. १ हा मयत झाल्यानंतर नि. १७ प्रमाणे दावा दुरुस्ती करुन प्रतिवादी क्र. १अ हीस याकामी पक्षकार करण्यात आलेले आहे. प्रतिवादी क्र. १अ ने नि.२८ अन्वये तिची कैफियत दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादीच्या कथनानुसार सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २ यांना कधीही खरेदीदस्त करुन दिलेला नाही व सदरील दाव्यातील प्रतिवादी क्र. २ याने प्रतिवादी क्र. १ यास पैसेही दिलेले नाहीत. सदर दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. २ यांची कधीही कब्जेवहिवाट नव्हती व नाही. तसेच, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १अ यांचे वडीलार्जीत मालकी वहिवाटीची असून त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. १अ यांचा समाईकांमध्ये कब्जा व वहिवाट आहे असे कथन केले आहे.

७) प्रतिवादी क्र. २ याने सदर दाव्यामध्ये कैफियत न दिल्याने त्याचेविरुध्द दावा दि. ०३/१२/२०२५ रोजी दावा विना कैफियत चालविण्याचा नि. १ वर आदेश पारीत झालेला आहे.

८) वादी पक्षातर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. कलढोणे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री. एस. ए. सावंत यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.२ चे विधीज्ञ यांनी पुरेशी संधी देवून याकामी युक्तीवाद केला नाही. सबब, त्यांचेविरुध्द नि.१ वरील आदेशान्वये युक्तिवाद नाहीचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले. मी दाव्यातील विषयाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे मुद्दे निश्चित करुन त्यावरील माझे निष्कर्ष पुढील कारणांकरीता प्रत्येक मुद्द्यांचे समोर लिहिलेले आहेत.

अ.क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१)	वादी हे सिध्द करतो का की, दावा मिळकत ही त्यांची व प्रतिवादी क्र. १ ची समाईक वहिवाटीची ...... मिळकत आहे ?	नकारार्थी

२)	वादी हे मागणी केल्याप्रमाणे वाद मिळकतीतील त्यांचा हिस्सा वाटणी होउन कब्जा मिळणेस पात्र आहेत काय ? असल्यास किती ?	......	नकारार्थी.
३)	वादी हे सिध्द करतो का की, वादीने प्रतिवादी क्र. २ यास करुन दिलेले खरेदीपत्र चुकीचे व बेकायदेशीर आहे ?	......	नकारार्थी.
४)	वादीस दावा मिळकतीपैकी ४० गुंठे क्षेत्राचे प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ यास करुन दिलेले खरेदीपत्र बेकायदेशीर आहे हा जाहीर ठराव होवून मिळणेचा हक्क आहे का ?		नकारार्थी.
५)	वादीस प्रतिवादी क्र. १ व २ हे त्यांचे दावा मिळकतीत वहिवाटीस हरकत करु नये अशी निरंतर ताकीद मागण्याचा हक्क आहे का ?		नकारार्थी.
६)	काय खर्च, आदेश व हुकूमनामा ?	......	दावा नामंजूर करणेत येतो.

कारणे.

मुद्दा क्र. १ ते ५ करिता

९) वादींनी सदरचा दावा हा वाद मिळकतीतील त्यांचे हिश्याचे सरसनिरस मानाने वाटप होउन त्याचा पृथक तुकडा पाडून त्याचा कब्जा वादी यांना मिळावा म्हणून दाखल केला आहे. वादींचा दावा हा वाटपासाठी व जाहीर ठरावासाठी असल्याने वादीने तो वाटप मिळण्यास पात्र आहेत हे सिध्द करण्याची आवश्यकता आहे.

१०) वादींनी आपले दाव्यातील कथनांबाबत नि. क्र. २९ प्रमाणे वादीतर्फे साक्षीदार क्र. १ स्वतः राजाराम दामू जाधव यांचा पुरावा अभिलेखावर दाखल केला आहे. सदर पुराव्यामध्ये त्याने मुळ दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. प्रतिवादी क्र. १अ ने त्याचा उलटतपास घेतला

नसल्याने त्यांचेविरुध्द दि. ०३/०४/२०२३ रोजी उलटतपास नाहीचा आदेश पारीत करण्यात आला आहे. वादीतर्फे सा.क्र. २ बाबा ज्ञानू जाधव यास नि. ३२ अन्वये तपासले आहे. सदर साक्षीदाराने शपथेवर कथन केले आहे की, दावा मिळकत ही त्याच्या मालकीची आहे. दावा जमीनीमध्ये प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे जो हिस्सा आहे. त्या हिस्यामध्ये वादीचा ८ आणे हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. १ हा मयत असून त्याचा संपूर्ण हिस्सा हा वादींच्या कब्जात वहिवाटीस आहे. वादी त्यामधून ज्वारी , बाजरी पिके घेवून उत्पन्नन घेत आहे. सदर दावा मिळकतीचे अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. सदर दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ याच्या नावावर कुटूंबासाठी असल्यामुळे त्याचा फायदा प्रतिवादी क्र. १ ने घेतला व त्याचे नावे असणारी संपूर्ण जमीन विक्री केलेली आहे. प्रतिवादी क्र २ याचा दावा मिळकतीमध्ये कब्जा व वहिवाट नाही. सदर दावा मिळकतमध्ये प्रतिवादी क्र. २ अथवा प्रतिवादी क्र. १ चे वारस कधीही वहिवाट करण्यास आले नाहीत असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराचा प्रतिवादीतर्फे उलटतपास घेण्यात आलेला नाही. वादीतर्फे सा.क्र. ३ दत्तु आनंदा करे यास नि .३७ अन्वये तपासल्याने सदर साक्षीदाराने शपथेवर कथन केले आहे की, तो प्रतिवादी क्र..२ यास ओळाखतो व प्रतिवादी क्र.१ यास ओळखत नाही. तो दि. २६/१२/२०१८ रोजी म्हसवड येथे दस्त घेताना हजर होता. त्याने दस्त क्र. ३६५०/२०१८ वर साक्षीदार म्हणून सही केली आहे. तथापी त्याला सदर दस्तावरील लिहून घेणार, लिहून देणार यांच्याबबत कोणतीही माहिती नाही व दस्तातील मजकुर त्याला वाचून दाखविला नव्हता. किंवा त्याने तो वाचून पाहिला नव्हता व केवळ प्रतिवादी क्र. २ याच्या सांगण्यावरुन त्याने दस्तावर सही केली आहे असे कथन केले आहे. सदर साक्षीदारचा उलटतपास प्रतिवादींनी घेतला नसलयाने त्यांनी दि. ०९/०९/२०२५ रोजी उलटतपास नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. नि. ३९ अन्वये वादीने पुरावा बंदची पुरशीस दाखल केली आहे.

११) वादीने त्याचे दाव्याचे पृष्ठर्थ यादी नि. ३ सोबत दावा मिळकत गट नं. १८३८ चा ७/१२ (नि. ६), अ.क्र. २ सोबत वादीने दि. १०/०९/१९९० रोजी नामदेव गणू मदने याचेकडून दावा मिळकत गट क्र. १८३८ मधील खरेदी केलेले क्षेत्राची खरेदीखताची छायांकित प्रत दाखल केली आहे. अ.क्र. ३ सोबत सर्वे नं. ६६४/२अ ७/१२ उता-याची छायांकीत प्रत दाखल केली आहे. तसेच, यादी नि. ३६ सोबत दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ यास दि. २६/१२/२०१८ रोजी खरेदीखत क्र. ३६५०/२०१८ याचे साक्षांकीत प्रत दाखल केली आहे.

१२) सदरकामी प्रतिवादीने त्यांच्यातर्फे कोणताही लेखी अथवा तोंडी पुरावा दाखल केलेला नाही त्यामुळे दि. १३/०१/२०२५ रोजी प्रतिवादीचा पुरावा नि. १ वरील आदेशान्वये बंद करण्यात आलेला आहे.

१३) वादीने दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी याचे नावे १.२७.२५ पो. ख. ०.०१.५० इतके क्षेत्र फेरफार क्र. २१६२ ने नमूद आहे. प्रतिवादी क्र. १ याचे नावे ०.८८.७५ पो. ख.०० इतके क्षेत्र फेरफार क्र. ७६१० अन्वये नमूद आहे. प्रतिवादी क्र. २ याचे नावे ०.३८.५० पो. ख. ०.०१५० इतके क्षेत्र फेरफार क्र. ७६१० ने नमूद केलेले आहे. म्हणजेच सदर दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ ने १.२७.२५ इतक्या क्षेत्रापैकी ०.३८.५० इतके क्षेत्र प्रतिवादी क्र. २ यास विक्री केलेले आहे व तशी प्रतिवादी क्र. २ याचे नावे फेरफार क्र. ७६१० अन्वये नोंद झालेली दिसून येते.

१४) वादीने त्याचे दाव्यातील कथनामध्ये सदर दावा मिळकतीत वादीचे १२८.७५ गुंठे क्षेत्र दिसत आहे ते वादीने दि. १०/०९/१९९० रोजी नामदेव मदने याचेकडून खरेदी केलेले क्षेत्र आहे व ते वडीलार्जीत नाही त्यामुळे ते वाटपास पात्र नाही असे नमूद केले आहे. सदर कथनाच्या अनुषंगाने वादीने त्या खरेदीपत्राची छायांकीत प्रत याकामी दाखल केली आहे. वादीने दाखल केलेलया सर्वे क्र. ६६४/२अ या छायांकीत प्रतीचा दावा मिळकतीशी काय संबंध आहे याबाबत दाव्यामध्ये कोठेही कथन नाही त्यामुळे सदर सर्वे नं. ६६४/२अ याचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध असल्याचे दिसून येत नाही. तसेच, सदर सर्वे नं. ६६४/२अ चा ७/१२ छायांकीत प्रतीत असल्यामुळे तो याकामी पुरावा म्हणून ग्राहय देखील धरण्यात आलेला नाही. वादीने दाखल केलेल्या खरेदीदस्त क्र. ३६५०/२०१८ चे साक्षांकीत प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ यास लागवडीलायक क्षेत्र ३८५० चौ.मी. पो. ख. ०.०१५० हे ओढयालगत दक्षिणोत्तर वहिवाटीप्रमाणे खरेदी दिले आहे. सदर खरेदीखतासोबत जोडलेल्या दावा मिळकतीच्या ७/१२ उता–याचे प्रतीचे अवलोकन केले असता सन २००२–०३ ते २०१७–१८ या कालावधीमध्ये बाळू दामू जाधव म्हणजेच प्रतिवादी क्र. १ याचे नावे ४ आणे क्षेत्र व प्रतिवादी क्र. १ याचे नावे ४ आणे क्षेत्र दिसून येते. तदनंतर, सन २०१७–१८ या वर्षातील दावा मिळकतीच्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता वादी याचे नावे १.२७.२५ पो. ख. ०.०१.५० तसेच प्रतिवादी क्र. १ याच्या नावे देखील १.२७.२५ पो. ख. ०.०१५० इतक्या क्षेत्राची नोंद फेरफार क्र. २१६२ ने झालेली दिसून येत आहे. म्हणजेच वादी व प्रतिवादी यांचे फेरफार क्र. २१६२ ने समान क्षेत्रास नोंद असलेली दिसून येते. अशा परीस्थीतीमध्ये जर वादी दावा मिळकत ही वडीलार्जीत सामाईक वहिवाटीची मिळकत आहे व दावा मिळकतीचे त्याच्यामध्ये व प्रतिवादी क्र. १ मध्ये वाटप झाले नाही असे कथन करत असेल तर प्रथम त्याने दावा मिळकत ही वडीलार्जीत

मिळकत आहे हे सिध्द केले पाहिजे. तथापी, वादीने दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ ची वडीलार्जीत सामाईक वहिवाटीची मिळकत आहे हे दाखविणेकामी कोणताही कागदोपत्री पुरावा अथवा तत्सम फेरफार दाखल केलेला नाही. वादीने दावा मिळकत गट नं. १८३८ यामध्ये समान हिश्याने त्यास व प्रतिवादी क्र. १ यास फेरफार क्र. २१६२ ने कशी मिळकत आली हे कोठेही नमूद केले नाही अथवा फेरफार क्र. २१६२ दाखल देखील केलेला नाही. याउलट वादी कथन करतो की, गट क्र. १८३८ मधील त्याचे नावे असणारे क्षेत्र १२८.७५ हे त्याने सन १९९० साली खरेदी केलेले आहे व ती वडीलार्जीत मिळकत नाही. म्हणजेच वादी हा सदर गटामधील प्रतिवादी व त्याचे नावे असणारे समान हिश्याचे क्षेत्राबाबत कोणताही खुलासा न करता केवळ प्रतिवादी क्र. १ च्याच नावे असणा-या मिळकतीत वाटप मागत आहे. त्यामुळे वादी हा स्वच्छ हाताने व सर्व वस्तुस्थीती कोर्टासमोर न मांडता त्याचा हक्क मागत आहे. अशा परीस्थीतीमध्ये वादी दावा मिळकत ही वडीलार्जीत सामाईक वहिवाटीची मिळकत आहे हे सिध्द करु शकला नाही.

१५) प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीतील ०.३८.५० पो. ख. ०.१५० इतके क्षेत्र प्रतिवादी क्र. २ यास नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी दिलेले आहे. वादीने देखील सदर दाव्यामध्ये खरेदीखत बोगस आहे अथवा प्रतिवादी क्र. १ ने कधीही खरेदीखत प्रतिवादी क्र. २ यास करुन दिलेले नव्हते असे कथन केलेले नाही. अशा परीस्थीतीमध्ये प्रतिवादी क्र. १अ ही प्रतिवादी क्र. १ ची वारस असून तिने याकामी कैफियत देवून असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ यास कधीही खरेदीखत करुन दिलेले नव्हते अथवा प्रतिवादी क्र. १ यास कधीही पैसे मिळालेले नव्हते. तथापी, प्रतिवादी क्र. १अ ने सदरची कथने सिध्द करण्यासाठी कोणताही पुरावा दिलेला नाही. प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ यास दावा मिळकतीतील क्षेत्राचे करुन दिलेले

खरेदीखत हे नोंदणीकृत असल्याने त्यास एक अनुमात्मक मुल्य (Presumptive value) प्राप्त होते मात्र हे अनुमान अंतिम किंवा निर्णायक स्वरुपाचे नसून ते खंडणयोग्य आहे. प्रतिवादी क्र. १अ ने सदर नोंदणीकृत खरेदीखतावर आक्षेप घेतला आहे अशावेळी प्रतिवादी क्र. १अ ने सदर खरेदीखत हे बेकायदेशीर आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी असते. प्रतिवादी क्र. १अ ने तिच्या कैफियतीचे पृष्ठर्थ कोणताही पुरावा देवून त्याचे खंडण केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ यास करुन दिलेले खरेदीखत क्र. ३६५०/२०१८ हे कायदेशीर आहे हे स्पष्ट होते. वादीतर्फे सा.क्र. ३ याने त्याला खरेदीखतातील मजकुर माहित नाही परंतु त्याने खरेदीखतावर साक्षीदार म्हणून सही केली आहे ही बाब मान्य करतो त्यामुळे जरी त्याला खरेदीखतातील मजकुर माहित नसेल तरी खरेदीदस्ताच्यावेळी तो हजर होता व त्या दस्तावर त्याने साक्षीदार म्हणून सही केली आहे व तो प्रतिवादी क्र. २ यास ओळखत होता यासर्व बाबी त्याने पुराव्यामध्ये कथन केल्याने खरेदीखत क्र. ३६५०/२०१८ हे सिध्द झालेले आहे.

१६) वादी हा दावा मिळकत ही वडीलार्जीत असल्याचे सिध्द करु न शकल्याने प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीतील क्षेत्राचे प्रतिवादी क्र. २ यास करुन दिलेली खरेदीखत ३६५०/२०१८ हे वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही हे देखील तो सिध्द करु शकला नाही. तसेच दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १ ची सामाईक वहिवाटीची असल्याने प्रतिवादी क्र. २ हा त्यास हरकत अडथळा करत आहे ही बाब देखील वादी सिध्द करु शकला नाही त्यामुळे वादीस दावा मिळकतीमध्ये वाटप, जाहीर ठराव व प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीद मागण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ५ चे उत्तर नकारार्थी देवुन मुद्दा क्र. ६ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वादीचा दावा नामंजूर करणेत येत आहे.

२. खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Digitally signed by SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Date: 2026.07.07 11:52:48 +0530

ता. ०७/०७/२०२६
म्हसवड

(**एस. एस. साळुंखे**)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, म्हसवड